# सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय

नविन शासकीय तंत्रनिकेतन परिसर, पोस्ट बॉक्स नं-२१९,
सामनगांवरोड,नाशिकरोड,नाशिक
☎ ०२५३-२४६१४७९, फॅक्स : २४५१५३०१
e-mail : **ronsk_nsk@sancharnet.in** web site :www.dtensk.org


जा.क.तंशि/विकाना/लले/राशिपु११-१२/ 1881
दिनांक:-३०.११.२०११.

संकेत स्थळावरुन प्रसिध्दीसाठी
**तातडीचे-कालमर्यादित.**

प्रति,
सर्व प्राचार्य,
शासकीय/अशासकीय अनुदानित व विनाअनुदानित
अभियांत्रिकी/औषधनिर्माणशास्त्र/तंत्रनिकेतने,नाशिक विभाग.
कुलसचिव,उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगांव.

**विषय :- आदर्श राज्य शिक्षक पुरस्कार २०११-२०१२ बाबत...**

संदर्भ:- मा.संचालक,तंत्रशिक्षण संचालनालय,म.राज्य,मुंबई यांचे पत्र. क्रमांक ४अ/आस्था/ आराशि/२०११-१२/४८७५, दिनांक २८ नोव्हेंबर,२०११ व त्यासोबतचा महाराष्ट्र शासन,उच्च व तंत्रशिक्षण विभाग शासन निर्णय क.शिरापु/(१७७/०८)/समन्वय,दिनांक १६.२.२०१०.

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने मा.संचालक,तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य,मुंबई यांचे वरील संदर्भिय पत्रानुसार आपणांस कळविण्यात येते की, सन २०११-२०१२ या वर्षाकरीता तंत्रशिक्षण क्षेत्रातील शिक्षकांना आदर्श राज्य शिक्षक पुरस्कार देण्याबाबतची माहिती संचालनालयामार्फत शासनास सादर करावयाची आहे. त्याअनुषंगाने या विभागीय कार्यालयाच्या अधिपत्याखालील अभियांत्रिकी महाविद्यालये,औषधनिर्माणशास्त्र/तंत्रनिकेतने यामधील शिक्षकाची निवड करुन विहित सूचनांचे तंतोतंत पालन करुन परिपूर्ण प्रस्ताव या कार्यालयास दिनांक ०२.१२.२०११ पर्यंत सादर करावा. यासंदर्भात संचालनालयाचे उपरोक्त संदर्भिय पत्रासोबतचा शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण विभाग शासन निर्णय क. शिरापु/(१७७/०८)/समन्वय,दिनांक १६.२.२०१० अन्वये राज्य शिक्षक पुरस्काराचे सुधारित निकष, नियम,पात्रता इत्यादींबाबत नियम निर्धारित केलेले असून त्या शासन निर्णयाची प्रत सोबत जोडली आहे.

तरी सोबत जोडलेल्या शासन निर्णयातील राज्य शिक्षक पुरस्काराबाबतचे निकष,पात्रता व नियम इत्यादींची पडताळणी करुन आपल्या संस्थेतील सदरहू बाबी पूर्ण करणा-या शिक्षकीय अधिका-यांचे प्रस्ताव तीन प्रतीत संपुर्ण दस्तावेजासह या कार्यालयास दि.२.१२.२०११ पर्यंत खास दुतामार्फत सादर करावेत.

तसेच प्राचार्य हे पद शिक्षक संवर्गातील असून शासनाच्या दि.६.१२.१९९६ च्या शासन निर्णयान्वये शिक्षक पुरस्कारासाठी विहित केलेली सुधारित पात्रता व निकष सर्वदृष्टीने पुर्ण करणा-या प्राचार्यांची माहिती संचालनालयास व कार्यालयास उपलब्ध नसल्याने त्यांनी सोबत जोडलेल्या विहित विवरणपत्रात आवश्यक ती माहिती, कागदपत्रे,प्रमाणपत्रे, प्रसिध्द झालेले पेपर्स, पुस्तके इत्यादीची संबंधीत प्राचार्यांची माहिती या कार्यालयास तीन प्रतीत दि.२.१२.२०११ पर्यंत हस्तदेय सादर करण्यात यावी. सदर माहिती थेट संचालनालयास सादर करण्यात येवू नये.

दिनांक २.१२.२०११ पर्यंत आपल्या संस्थेची शिक्षक पुरस्कारासाठी आवश्यक असलेली माहिती या कार्यालयास प्राप्त न झाल्यास आपल्या संस्थेतील शिक्षक हे शिक्षक पुरस्कारासाठी विचारात घेतले जाणार नाहीत. तसेच आपल्या संस्थेची माहिती निरंक असल्यास त्याप्रमाणेही या कार्यालयास कळविण्यात यावे.

आदर्श राज्य शिक्षक पुरस्काराचा आपल्या संस्थेतील पात्र अध्यापकांचे प्रस्ताव आवश्यक त्या प्रपत्रासह या कार्यालयास दिनांक २.१२.२०११ पर्यंत निश्चितपणे प्राप्त होईल याची दक्षता घेवून सादर करावा. सदरची माहिती ISM FONT (DV-TT Yogesh/DV-TT Natraj) मध्ये तयार करुन पेनड्राईव्हसह या कार्यालयास पाठविण्यात यावी. उपरोक्त माहिती पाठविण्यासाठी विहित केलेल्या कालमर्यादेचे कटाक्षाने पालन करावे.

(दि.रा.नंदनवार )
प्र.सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,नाशिक.

सहपत्रे:-विवरणपत्राचा नमुना - सहपत्रे - ९.

प्रत- मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना माहितीस्तव सादर.

प्रत-प्रोग्रामर,तंत्रशिक्षण,वि.का.नाशिक. त्यांना कळविण्यात येते की,सदरहू पत्र उपरोक्त संदर्भिय पत्र व सहपत्रांसह या कार्यालयाचे संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावे.

# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी -२२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२./२२६९०००७

तार - edutech E-mail : dte 4a@rediff.com Internet: http / www. dte.org.in

**कालमर्यादीत**

**अतितात्काळ**

क्रमांक : ४अ/आस्था/आराशि/२०११-१२/४८७५

दिनांक :२८.११.२०११

प्रति,

१) सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय
मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपुर

२) अध्यक्ष,
महाराष्ट्र राज्य, तंत्र शिक्षण मंडळ, बांद्रा, मुंबई

**विषय : आदर्श राज्य शिक्षक पुरस्कार २०११-२०१२**

**संदर्भ** :१)शासन निर्णय क्रमांक : शिरापु २००८/(१७७/०८)/समन्वय,
दिनांक : १६.०२.२०१०

२) शासन निर्णय क्रमांक : शिरापु २०१०/(१५३/११)/समन्वय,
दिनांक : २५.११.२०११

आपणांस कळविण्यात येते की, सन २०११-२०१२ या वर्षाकरीता तंत्रशिक्षण क्षेत्रातील शिक्षकांना आदर्श राज्य शिक्षक पुरस्कार देण्याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर करावयाचा असल्याने आपल्या अधिपत्याखालील अभियांत्रिकी महाविद्यालये/औषधनिर्माणशास्त्र/ तंत्रनिकेतने या मधील शिक्षकाची निवड करुन पुढील सुचनाचे तंतोतत पालन करुन परिपूर्णप्रस्ताव या संचालनालयास **दिनांक ०३.१२.२०११** पर्यत सादर करावा. या संदर्भात संदर्भिय १ चा उच्च व तंत्रशिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक शिरापु २००८/(१७७/०८)/समन्वय, दिनांक १६ फेब्रूवारी, २०१० अन्वये राज्य शिक्षक पुरस्काराचे सुधारीत निकष, नियम, पात्रता इत्यादींबाबत नियम निर्धारीत केले असुन त्या शासन निर्णयाची प्रत सोबत जोडली आहे.

सोबत जोडलेल्या शासन निर्णयातील निकष व पात्रता इ. ची पडताळणी करुन निर्देशानुसार कार्यवाही करावी व दिनाक ०३.१२.२०११ पर्यत सर्व दस्तवेजासह प्रस्ताव तीन प्रतीत संचालनालयास सादर करावेत.

प्राचार्य हे पद शिक्षक संवर्गातील असून शासनाच्या दिनांक ०६.१२.१९९६ च्या शासन निर्णयान्वये शिक्षक पुरस्कारासाठी विहीत केलेली सुधारीत पात्रता व निकष सर्वदृष्टीने पूर्ण करणा-या प्राचार्याची माहिती या कार्यालयास उपलब्ध नसल्याने त्यांनी वर नमुद केलेल्या विहीत विवरणपत्रात आवश्यक ती माहिती कागदपत्रे, प्रमाणपत्रे, प्रसिध्द झालेले पेपर्स, पुस्तके इत्यादीची संबंधित प्राचार्याची माहिती सहसंचालकांनी उपलब्ध करुन घेऊन सादर करण्यात यावी. सदर माहिती या संचालनालयाकडे संबंधित विभागीय कार्यालयामार्फतच सादर करावी. **संस्थेकडून थेट संचालनालयास सादर केलेल्या प्रस्तावाचा विचार केला जाणार नाही या बाबीची कृपया नोंद घ्यावी.**

दिनांक ०३.१२.२०११ पर्यंत आपल्या विभागातील कार्यालय/संस्थामधील शिक्षक पुरस्कारासाठी आवश्यक असलेली माहिती विहित मुदतीत प्राप्त न झाल्यास आपल्या विभागातील शिक्षक हे शिक्षक पुरस्कारासाठी विचारात घेतले जाणार नाहीत. तसेच विभागीय कार्यालयाची माहिती निरंक असल्यास त्याप्रमाणेही कळविण्यांत यावे.

आदर्श राज्य शिक्षक पुरस्काराचा **परिपूर्ण प्रस्ताव आवश्यक त्या प्रपत्रासह या संचालनालयास दिनांक ०३.१२.२०११ पर्यंत** निश्चितपणे प्राप्त होईल याची दक्षता घेऊन सादर करावा. सदरची माहिती **ISM FONT (DV-TTYoesh / DV-TTNatraj )** मध्ये तयार करुन **पेनड्राईव्हसह** पाठविण्यात यावी. विभागीय स्तरावर गठित करण्यांत येणा-या समिती सदस्यांची नावे स्वतंत्रपणे कळविण्यांत येतील. सदर माहिती खास दूताकरवी पाठविण्यात यावी.

( डॉ. सुभाष महाजन )
प्र.संचालक,तंत्रशिक्षण,महाराष्ट्र राज्य,मुंबई

**प्रत** : कार्यासन क्रमांक ६ मुख्य कार्यालय,मुंबई यांना माहितीसाठी

# महाराष्ट्र शासन

क्रमांकः- राशिपु २०१०/( १५३ /११)/समन्वय
उच्च व तंत्रशिक्षण विभाग,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ३२.
दिनांक :- २५.११.२०११

प्रति,

संचालक , उच्च शिक्षण, शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे - १
संचालक , तंत्र शिक्षण, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई - १
संचालक , व्यवसायशिक्षण, व्यवसायशिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई - १
संचालक , प्रशिक्षण , व्यवसायशिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई - १
संचालक , कला शिक्षण, कला शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई - १
संचालक , ग्रंथालय, ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई - १

विषय :- आदर्श राज्य शिक्षक पुरस्कार सन २०११-१२ करीता शिक्षकांच्या नावांची शिफारस करणे बाबत.

महोदय,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपणांस असे कळविण्यात येते की, आदर्श राज्य शिक्षक पुरस्कार दरवर्षी दिनांक २६ जानेवारी रोजी जाहीर करावयाचे असतात. तसेच सदर पुरस्काराचे वितरण दिनांक ५ सप्टैबर , (शिक्षक दिनी) प्रदान करावयाचे असते. सबब सन २०११-१२ या वर्षाकरिता शासन निर्णय क्र. शिरापु २००८/(१७७/०८)/ समन्वय , दिनांक १६/२/२०१० मध्ये नमूद केलेल्या निकषानुसार पात्रताधारक शिक्षकांच्या नावांच्या शिफारशींचे प्रस्ताव दिनांक १५/१२/२०११ पूर्वी शासनास सादर करावे. सदर प्रस्ताव पाठवितांना एका पुरसकारासाठी किमान ४ शिक्षकांची शिफारस शासन स्तरावरील निवड समितीकडे करण्याची दक्षता घ्यावी, ही विनंती.

आपला,

(बा. मा. राऊत)
उप सिचव , महाराष्ट्र शासन

**राज्य शिक्षक पुरस्कारासाठी शिक्षकांची निवड करण्यासाठी लागु करावयाची पात्रता / निकष**
**अभियांत्रिकी महाविद्यालयातील / औषधनिर्माणशास्त्रातील / तंत्र निकेतनातील शिक्षकांसाठी**

| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. | ७. | ८. | ९. | १०. | ११. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ. क्र | अध्यापकांचे नाव, जन्मतारीख, संस्थेचे नाव | शैक्षणिक अर्हता पीएच.डी / एम.फील सेवा प्रवेश नियमानुसार १५ गुण व पीएच.डी असल्यास अधिक ५ गुण | संबधित शिक्षकाने किमान २ विद्यार्थ्यांना पीएच.डी मार्गदर्शक म्हणुन काम केलेले असावे. | आंतरराष्ट्रीय / राष्ट्रीय सेमिनारमध्ये किमान २ संशोधनात्मक पेपर्स प्रसिध्द झालेले असावेत. | स्वतःच्या विषयाशी संबधित २ दर्जेदार ग्रंथ प्रकाशित झालेले असावेत. | शासन मान्य संस्थेतील शिक्षक म्हणुन सेवा किमान १५ वर्ष असावी. | शिक्षकाने गेल्या ५ वर्षात शिकविलेल्या प्रत्येक विषयातील किमान ५० टक्के विद्यार्थीनी ६० टक्के पेक्षा जास्त गुण प्राप्त केलेले असावेत. त्यातील १० टक्के विद्यार्थ्यांनी ७५ टक्के गुण प्राप्त केलेल असावेत. | मागील ५ वर्षातील गोपनीय अहवाल किंवा परफॉर्मन्स, मुल्यमापन किमान ३ वर्षासाठी अतिउत्कृष्ट व किमान २ वर्षासाठी उत्कृष्ट असणे आवश्यक आहे. | एकूण गुण | अभिप्राय |
| | | २० गुण | १५ गुण | गुण १५ | १५ गुण | १५ गुण | १० गुण | १० गुण | १०० गुण | |

राज्य शिक्षक पुरस्काराचे सुधारीत निकष, नियम, पात्रता इत्यादींबाबत.

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्रशिक्षण विभाग,
शासन निर्णय क्रमांकः-शिरापु २००८/(१७७/०८)/समन्वय,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२.,
दिनांक :- १६ फेब्रुवारी, २०१०.

वाचा :-

१. उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवायोजन विभागाचा शासन निर्णय क्रमांक : शिरापु १०९४/(१६१/९५)/ साशि ७, दि. ७ ऑगस्ट, १९९५.
२. उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवायोजन विभागाचा शासन निर्णय क्रमांक : शिरापु १०९२/(१६१)/साशि ७, दि. २२ ऑगस्ट, १९९५.
३. उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवायोजन विभागाचा शासन निर्णय क्रमांक : शिरापु १०९६/(२०४/९६)/ समन्वय, दि. ६ डिसेंबर, १९९६.
४. उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवायोजन विभागाचा शासन निर्णय क्रमांक : शिरापु १०९६/(२७९/९६)/ समन्वय, दि. १३ डिसेंबर, १९९६.
५. उच्च व तंत्रशिक्षण विभागाचा शासन निर्णय क्रमांक : शिरापु १००२/(१६३/२००३)/समन्वय, दि. १३ ऑगस्ट, २००३.
६. उच्च व तंत्रशिक्षण विभागाचा शासन निर्णय क्रमांक : शिरापु २००६/(४२९/०६)/समन्वय, दि.३ फेब्रुवारी, २००७.

प्रस्तावना :- संदर्भ क्र. १ अन्वये उच्च शिक्षण, तंत्रशिक्षण, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, व कला शिक्षण क्षेत्रातील शिक्षकांना राज्यस्तरीय पुरस्कार देण्याकरिता निवड समिती नेमण्यात आली आहे. संदर्भ क्र. २ अन्वये उच्च शिक्षण, तंत्रशिक्षण, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, व कला शिक्षण क्षेत्रातील पुरस्कारांची संख्या, नियम, निकष व पात्रता, निवड पध्दती, पुरस्काराची घोषणा व वितरण याबाबतचे तपशिल जाहीर करण्यात आले आहेत. संदर्भ क्र. ३ अन्वये सुधारीत नियम जाहीर करण्यात आले असून, राज्यातील तंत्रनिकेतने व अभियांत्रिकी महाविद्यालये यामधील शिक्षकांना राज्य पुरस्कार देण्यासंबंधी सुधारीत नियम निश्चित करण्यात आले आहेत. त्यानुसार ज्या शिक्षकांची प्रशासकीय पदावर पदस्थापना झाली आहे. पण जे मुलतः शिक्षक संवर्गातील आहेत, अशा शिक्षकांसाठी १ पुरस्कार देणे अभिप्रेत आहे. तसेच उत्कृष्ट तंत्रनिकेतन या सदराखाली मुलींच्या तंत्रनिकेतनासोबत इतर तंत्रनिकेतनांचाही समावेश करण्यात आला आहे. संदर्भ क्र. ४ अन्वये राज्य पुरस्कार व आगाऊ वेतनवाढ यासंबंधी स्पष्टीकरण करण्यात आले आहे. संदर्भ क्र. ५ अन्वये पुरस्कारांची संख्या वाढविण्यात आली असून, संदर्भ क्र. ६ अन्वये पुरस्काराची रक्कम निश्चित करण्यात आली आहे.

सदर पुरस्कारासंाठी पात्रता, नियम, निकष यात सुधारणा करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधिन होता. त्यानुसार आवश्यक त्या ठिकाणी अधिक्रमण करुन पुढीलप्रमाणे सुधारीत शासन निर्णय जाहीर करण्यात येत आहे.

(कृ.मा.प.)

**शासन निर्णय:-** उच्च शिक्षण, अभियांत्रिकी व तंत्रशिक्षण, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण आणि कला शिक्षण क्षेत्रातील शिक्षकांना दरवर्षी राज्य स्तरीय पुरस्काराने सन्मानित करण्यात येईल. या पुरस्कारांची संख्या पुढीलप्रमाणे असेल.

| अ.क्र. | शैक्षणिक | पुरस्कारांची विभागणी | पुरस्कारांची एकूण संख्या |
|---|---|---|---|
| १. | महाविद्यालयीन / विद्यापीठीय शिक्षकांसाठी राज्य पुरस्कार | १. मुंबई } या विद्यापठांच्या<br>२. पुणे } कार्यक्षेत्रातील<br>३. नागपूर } प्रत्येकी २ प्रमाणे | ६ |
| | | १. सोलापूर }<br>२. शिवाजी-कोल्हापूर }<br>३. डॉ.बाबासाहेब आंबेडकर } या<br>मराठवाडा-औरंगाबाद } विद्यापठांच्या<br>४. स्वामी रामानंद तीर्थ-नांदेड }कार्यक्षेत्रातील<br>५. उत्तर महाराष्ट्र-जळगांव }प्रत्येकी १<br>६. संत गाडगेबाबा-अमरावती } प्रमाणे<br>७. श्रीमती नाथीबाई दामोदर }<br>ठाकरसी महिला विद्यापीठ | ७ |
| २. | अभियांत्रिकी महाविद्यालय (फार्मसीसह) | | २. |
| ३. | तंत्रनिकेतने | | ३ |
| ४. | औद्योगिक प्रशिक्षण संस्था | महसूल विभागनिहाय प्रत्येकी १ प्रमाणे | ६ |
| ५. | शासकीय तंत्रिक विद्यालय | महसूल विभागनिहाय प्रत्येकी १ प्रमाणे | ६ |
| ६. | कला शिक्षण क्षेत्रातील शिक्षक | | १ |
| | | | **एकूण ३१.** |

**राज्य शिक्षक पुरस्काराचे निकष सोबत जोडण्यात आलेल्या परिशिष्टामध्ये नमूद करण्यात आले आहेत, त्यांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.**

## पुरस्काराची निवडपध्दती :-

पुरस्काराची निवडपध्दती पूर्वीप्रमाणेच राहील. प्रत्येक संचालकांनी आपल्या अखत्यारीत असणा-या क्षेत्रातील पुरस्कारास योग्य वाटणा-या शिक्षकांची यादी विहीत प्रक्रियेद्वारे निश्चित करुन सबळ कारणे व ठोस समर्थनासह शासनास सादर करावी. त्यात महिला, मागासवर्गीय व मागासलेल्या विभागांना योग्य ते प्रतिनिधित्व देण्यात यावे. दि. ७ ऑगस्ट, १९९५ च्या शासन निर्णयात नमूद केल्यानुसार शासन स्तरावरील निवड समिती याबाबत अंतिम निर्णय घेईल.

(पुढे चालू...)

**पुरस्काराची घोषणा व वितरण:-**

१. पुरस्काराची घोषणा प्रजासत्ताक दिनी दि. २६ जानेवारी रोजी करण्यात येईल व पुरस्काराचे वितरण शिक्षक दिनी (दि. ५ सप्टेंबर) करण्यात येईल.

२. सदर पुरस्कारासाठी होणारा खर्च संबंधित संचालकांच्या अखत्यारीत असणा-या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

३. हे आदेश सन २००८-२००९ या वर्षापासून पूर्वलक्षी प्रभावाने लागू राहतील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २०१००३०२२०२५०१००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(दि. धों. तिवरेकर)
उप सचिव , महाराष्ट्र शासन.

प्रति,
१. मा.मुख्यमंत्र्यांचे खाजगी सचिव, मुख्यमंत्री कार्यालय, मंत्रालय, मुंबई.
२. मा. मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा.राज्यमंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय , मुंबई.
४. प्रधान सचिव (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय , मुंबई.
५. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
६. संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
७. संचालक, व्यवसाय शिक्षण, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
८. संचालक, प्रशिक्षण, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
९. कला संचालक, कला शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१०. शिक्षण संचालक, शालेय शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
११. संचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई.
१२. सर्व सहसचिव / उपसचिव / अवर सचिव / कार्यासन अधिकारी, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
१३. कुलसचिव, सर्व विद्यापीठे.
१४. सर्व विभागीय शिक्षण सह संचालक, उच्च शिक्षण.
१५. सर्व विभागीय शिक्षण सह संचालक, तंत्रशिक्षण.
१६. सर्व विभागीय उप संचालक, व्यवसाय शिक्षण.
१७. वित्त विभाग /शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
१८. निवड नस्ती (समन्वय).

**उच्च व तंत्रशिक्षण विभाग शासन निर्णय क्रमांकः-शिरापु २००८/(१७७/०८)/समन्वय, दि. १६ फेब्रुवारी, २००९. चे परिशिष्ट.**

**राज्य शिक्षक पुरस्कार - शिक्षकांची निवड करण्यासाठी लागू करावयाचे सुधारीत निकष.**

**१) महाविद्यालयीन व विद्यापीठीय शिक्षकांसाठी :-**

| स्वअ. क्र. | निकष | गुणांक |
|---|---|---|
| १ | सेवा प्रवेश नियमानुसार १५ गुण व पी.एच.डी. किंवा नेट/सेट असल्यास अधिक ५ गुण. | २० गुण |
| २ | संबंधित शिक्षकाने किमान २ विद्यार्थ्यांना पी.एच.डी. मार्गदर्शक म्हणून काम केलेले असावे. | १५ गुण |
| ३ | आंतरराष्ट्रीय / राष्ट्रीय सेमिनारमध्ये किमान २ संशोधनात्मक पेपर्स प्रसिध्द झालेले असावेत. | १५ गुण |
| ४ | स्वतःच्या विषयाशी संबंधित २ दर्जेदार ग्रंथ प्रकाशित झालेले असावेत.<br>Research publication in refeared journal with impact factor 1.0 or above after the award of Doctoral research Phd/ D.sc. | १५गुण |
| ५. | शासन मान्य संस्थेतील शिक्षक म्हणून सेवा किमान १५ वर्षे असावी. | १५ गुण |
| ६. | शिक्षकाने गेल्या ५ वर्षात शिकविलेल्या प्रत्येक विषयातील किमान ५० टक्के विद्यार्थ्यांनी ६० टक्के पेक्षा जास्त गुण प्राप्त केलेले असावेत. त्यातील १० टक्के विद्यार्थ्यांनी ७५ टक्के गुण प्राप्त केलेले असावेत. | १० गुण |
| ७ | मागील ५ वर्षातील गोपनीय अहवाल किंवा परफॉर्मस, मुल्यमापन किमान ३ वर्षासाठी अतिउत्कृष्ट व किमान २ वर्षांसाठी उत्कृष्ट असणे आवश्यक आहे. | १० गुण |

**२) अभियांत्रिकी शिक्षकांसाठी :-**

| अ.क्र. | निकष | गुणांक |
|---|---|---|
| १ | सेवा प्रवेश नियमानुसार १५ गुण व पी.एच.डी. असल्यास अधिक ५ गुण. | २० गुण |
| २ | संबंधित शिक्षकाने किमान २ विद्यार्थ्यांना पी.एच.डी. मार्गदर्शक म्हणून काम केलेले असावे. | १५ गुण |
| ३ | आंतरराष्ट्रीय / राष्ट्रीय सेमिनारमध्ये किमान २ संशोधनात्मक पेपर्स प्रसिध्द झालेले असावेत. | १५ गुण |
| ४ | स्वतःच्या विषयाशी संबंधित २ दर्जेदार ग्रंथ प्रकाशित झालेले असावेत. | १५ गुण |
| ५. | शासन मान्य संस्थेतील शिक्षक म्हणून सेवा किमान १५ वर्षे असावी. | १५ गुण |
| ६ | शिक्षकाने गेल्या ५ वर्षात शिकविलेल्या प्रत्येक विषयातील किमान ५० टक्के विद्यार्थ्यांनी ६० टक्के पेक्षा जास्त गुण प्राप्त केलेले असावेत. त्यातील १० टक्के विद्यार्थ्यांनी ७५ टक्के गुण प्राप्त केलेले असावेत. | १० गुण |
| ७ | मागील ५ वर्षातील गोपनीय अहवाल किंवा परफॉर्मन्स, मुल्यमापन किमान ३ वर्षासाठी अतिउत्कृष्ट व किमान २ वर्षांसाठी उत्कृष्ट असणे आवश्यक आहे. | १० गुण |

### ३) तंत्रनिकेतनांतील शिक्षकांसाठी :-

| अ.क्र. | निकष | गुणांक |
| --- | --- | --- |
| १ | सेवा प्रवेश नियमानुसार १५ गुण व पी.एच.डी. असल्यास अधिक ५ गुण. | २० गुण |
| २ | संबंधित शिक्षकाने किमान २ विद्यार्थ्यांना पी.एच.डी. मार्गदर्शक म्हणून काम केलेले असावे. | १५ गुण |
| ३ | आंतरराष्ट्रीय / राष्ट्रीय सेमिनारमध्ये किमान २ संशोधनात्मक पेपर्स प्रसिध्द झालेले असावेत. | १५ गुण |
| ४ | स्वतःच्या विषयाशी संबंधित २ दर्जेदार ग्रंथ प्रकाशित झालेले असावेत. | १५ गुण |
| ५. | शासन मान्य संस्थेतील शिक्षक म्हणून सेवा किमान १५ वर्षे असावी. | १५ गुण |
| ६ | शिक्षकाने गेल्या ५ वर्षात शिकविलेल्या प्रत्येक विषयातील किमान ५० टक्के विद्यार्थ्यांनी ६० टक्के पेक्षा जास्त गुण प्राप्त केलेले असावेत. त्यातील १० टक्के विद्यार्थ्यांनी ७५ टक्के गुण प्राप्त केलेले असावेत. | १० गुण |
| ७ | मागील ५ वर्षातील गोपनीय अहवाल किंवा परफॉर्मन्स, मुल्यमापन किमान ३ वर्षासाठी अतिउत्कृष्ट व किमान २ वर्षासाठी उत्कृष्ट असणे आवश्यक आहे. | १० गुण |

### ४) व्यवसाय शिक्षण क्षेत्रातील शिक्षकांसाठी :-

| अ.क्र. | निकष | गुणांक |
| --- | --- | --- |
| १ | व्यवसाय शिक्षणाशी संबंधित किमान २ पेपर्स प्रसिध्द झालेले असावेत. निदेशकाने त्याच्या व्यवसायाच्या संबंधित, उद्योग उभारणीबाबत किमान १० प्रकल्प अहवाल प्रसिध्द केलेले असावेत. | २० गुण |
| २ | मागील ५ वर्षात सदर शिक्षकांच्या ६० टक्के विद्यार्थ्यांना रोजगार किंवा स्वयंरोजगार किंवा शिकाऊ उमेदवारी असे एकत्रीतरित्या ६० टक्के लक्ष पुर्ण केलेले असावे. | १५ गुण |
| ३ | विद्यार्थ्यांना विषय व्यवस्थीतरित्या आकलन व्हावा म्हणून सृजनशिल शैक्षणिक साहित्याची निर्मिती केलेली असावी. | १५ गुण |
| ४ | योजनेची प्रसिध्दी तसेच योजनेचा प्रचार व प्रसाराबाबत केलेले उल्लेखनीय काम, तंत्रशिक्षण भरती मेळाव्यात सहभाग असावा. | १५ गुण |
| ५ | शासन मान्य संस्थेतील शिक्षक म्हणून सेवा किमान १५ वर्षे असावी. | १५ गुण |
| ६ | शिक्षकाने गेल्या ५ वर्षात शिकविलेल्या प्रत्येक विषयातील किमान ५० टक्के विद्यार्थ्यांनी ६० टक्के पेक्षा जास्त गुण प्राप्त केलेले असावेत. त्यातील १० टक्के विद्यार्थ्यांनी ७५ टक्के गुण प्राप्त केलेले असावेत. | १० गुण |
| ७ | मागील ५ वर्षातील गोपनीय अहवाल किंवा परफॉर्मन्स, मुल्यमापन किमान ३ वर्षासाठी अतिउत्कृष्ट व किमान २ वर्षासाठी उत्कृष्ट असणे आवश्यक आहे. | १० गुण |

(पुढे चालू...)

५) व्यवसाय प्रशिक्षण क्षेत्रातील शिक्षकांसाठी :-

| अ.क्र. | निकष | गुणांक |
|---|---|---|
| १ | निदेशकाने त्याच्या व्यवसायाच्या संबंधित, उद्योग उभारणीबाबत किमान १० प्रकल्प अहवाल प्रसिध्द केलेले असावेत. | २० गुण |
| २ | मागील ५ वर्षात सदर शिक्षकांच्या ६० टक्के विद्यार्थ्यांना रोजगार किंवा स्वयंरोजगार प्राप्त झालेला असावा किंवा मागील ५ वर्षात दरवर्षी सरासरी निव्वळ रु.५०,०००/- चा महसूल संस्थेला मिळवून दिलेले असावा. | १५ गुण |
| ३ | विद्यार्थ्यांना विषय व्यवस्थीतरित्या आकलन व्हावा म्हणून सृजनशिल शैक्षणिक साहित्याची निर्मिती केलेली असावी. | १५ गुण |
| ४ | योजनेची प्रसिध्दी तसेच योजनेचा प्रचार व प्रसाराबाबत केलेले उल्लेखनीय काम, तंत्रशिक्षण भरती मेळाव्यात सहभाग असावा. | १५ गुण |
| ५ | शासन मान्य संस्थेतील शिक्षक म्हणून सेवा किमान १५ वर्षे असावी. | १५ गुण |
| ६ | शिक्षकाने गेल्या ५ वर्षात शिकविलेल्या प्रत्येक विषयातील किमान ५० टक्के विद्यार्थ्यांनी ६० टक्के पेक्षा जास्त गुण प्राप्त केलेले असावेत. त्यातील १० टक्के विद्यार्थ्यांनी ७५ टक्के गुण प्राप्त केलेले असावेत. | १० गुण |
| ७ | मागील ५ वर्षातील गोपनीय अहवाल किंवा परफॉर्मन्स, मुल्यमापन किमान ३ वर्षासाठी अतिउत्कृष्ट व किमान २ वर्षासाठी उत्कृष्ट असणे आवश्यक आहे. | १० गुण |

६) कला शिक्षण क्षेत्रातील शिक्षकांसाठी :-

| अ.क्र | निकष | गुणांक |
|---|---|---|
| १ | सेवा प्रवेश नियमानुसार १५ गुण व पी.एच.डी. असल्यास अधिक ५ गुण. | २० गुण |
| २ | आंतरराष्ट्रीय / राष्ट्रीय सेमिनारमध्ये किमान २ संशोधनात्मक पेपर्स प्रसिध्द झालेले असावेत. | १५ गुण |
| ३ | स्वतःच्या विषयाशी संबंधित २ दर्जेदार ग्रंथ प्रकाशित झालेले असावेत. | १५ गुण |
| ४ | राष्ट्रीय स्तरावरील मागील ५ वर्षात स्वतःच्या चित्रांची किमान २ प्रदर्शने झालेली असावीत. तसेच इतर स्तरावरील प्रदर्शनात स्वतःची चित्रे प्रदर्शित झालेली असावीत. | १५ गुण |
| ५ | शासन मान्य संस्थेतील शिक्षक म्हणून सेवा किमान १५ वर्षे असावी. | १५ गुण |
| ६ | कला क्षेत्रातील निगडीत अद्ययावत संगणक ज्ञान अनवार्य (जसे फोटो शॉप, पेज मेकर, कोरल ड्रॉ, इ.) | १० गुण |
| ७ | मागील ५ वर्षातील गोपनीय अहवाल किंवा परफॉर्मन्स, मुल्यमापन किमान ३ वर्षासाठी अतिउत्कृष्ट व किमान २ वर्षासाठी उत्कृष्ट असणे आवश्यक आहे. | १० गुण |

टिप :- पुरस्कारासाठी निवड करण्यात येणाऱ्या शिक्षकासंबंधी कोणत्याही प्रकारची शिस्तभंग विषयक अथवा फौजदारी स्वरुपाची कारवाई प्रस्तावित अथवा सुरु झालेली नसावी किंवा त्यास कोणत्याही प्रकारची शिक्षा झालेली नसावी. तसेच शिक्षक कोणत्याही कोचिंग क्लासेसशी संबंधीत नसावा.

(दि. पों. [illegible])